**अन्न व औषध प्रशासनाची कार्यप्रणाली fdamfg.maharashtra.gov.in MahalT द्वारे पुरविण्यात येणाऱ्या क्लाउड सर्वरवर होस्टिंग करण्यासाठी मान्यता देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: MEDD-१३/७/२०२६-MMD(Aush-२)**
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, गो. ते.रुग्णालय आवार इमारत, ९ वा मजला,
लो. टिळक मार्ग, मंत्रालय, मुंबई-४००००१
तारीख: ०१, जुलै २०२६

**वाचा:-**

१. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय क्रमांकः बजेट-२०२२/प्र.क्र.६३/औषधे-२, दि.२०.०७.२०२२
२. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०२२/प्र.क्र.६२/औषधे-२, दि.१५.०३.२०२३
३. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०२२/प्र.क्र.६२/औषधे-२, दि.२७.१२.२०२४
४. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग शासन निर्णय क्रमांक: MEDD-१३/७/२०२६-MD(Aush-२), दि.३०.०३.२०२६
५. आयुक्त, अन्न व औषध प्रशासन यांचे पत्र क्र.MAHAIT/CloudServis/१८९६/२०२६/११, दि.२०.०४.२०२६

**प्रस्तावना:-**

अन्न व औषध प्रशासनाच्या वेब एप्लिकेशन व वेबसाईट करिता M/s ESDS Software Solution Ltd. या संस्थेस देण्यात आलेल्या क्लाउड सर्वर च्या सेवेकरिता सन २०२५-२६ या वित्तीय वर्षात येणाऱ्या रू.५०,००,०००/- (अक्षरी रुपये पन्नास लाख फक्त) इतक्या खर्चास वाचा क्र.४ येथील शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. औषध विक्री आणि उत्पादन संस्थांसाठी परवाना देण्यासाठी 'XLN India' पोर्टलवर मोठे अवलंबित्व आहे आणि त्यासाठी सदर पोर्टल कार्यान्वित राहणे अत्यंत आवश्यक असल्याने M/s ESDS Software Solutions Pvt. Ltd.या संस्थेस दि.०१ एप्रिल २०२६ ते दि.३० जून २०२६ या कालावधीसाठी वाचा क्र.४ येथील शासन निर्णयानुसार मुदतवाढ (extension) देण्यात आली आहे. सदर शासन निर्णयातील मुद्दा क्र.३ नुसार मुदतवाढ कालावधी नंतर प्रशासनाने MahalT कडून पुरविण्यात येणाऱ्या Cloud सेवा उपलब्ध करून घेण्याबाबत प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार, अन्न व औषध प्रशासनाची कार्यप्रणाली fdamfg.maharashtra.gov.in MahalT द्वारे पुरविण्यात येणाऱ्या क्लाउड सर्वरवर होस्टिंग करण्याबाबत आयुक्त, अन्न व औषध प्रशासन यांनी वाचा क्र.५ येथील पत्रान्वये शासनास विनंती केली आहे. त्यानुषंगाने, प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

अन्न व औषध प्रशासनाची कार्यप्रणाली fdamfg.maharashtra.gov.in (XLNIndia) ही M/s ESDS Software Solution Ltd. या संस्थेच्या क्लाउड सर्वरवरून MahaIT द्वारे पुरविण्यात येणाऱ्या क्लाउड सर्वर वर होस्टिंग करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. उपरोक्त प्रकरणी येणारा खर्च "मागणी क्र.एस-४, ४२१०३७०१, १३- कार्यालयीन खर्च" या लेखाशिर्षामधील सन २०२६-२७ मधील उपलब्ध निधीतून भागविण्यात यावा.

३. सदर शासन निर्णय, माहिती तंत्रज्ञान विभागाने E-१५३५९०७ या नस्तीवर दि.२५.०५.२०२६ रोजीच्या टिप्पणीअन्वये दिलेल्या मान्यतेनुसार तसेच, वित्त विभाग, शासन निर्णय, क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम-भाग-२, दि. १७ एप्रिल २०१५ वित्तीय अधिकार नियम, पुस्तिका १९७८, भाग-पहिला, उपविभाग-२, अ.क्र.२७-अ, नियम क्र.७६ नुसार तसेच प्रशासकीय विभागाला दिलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०६०१११४०३०४११३ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

AJIT RAMESH JAGTAP

Digitally signed by AJIT RAMESH JAGTAP
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=MEDD, 2.5.4.20=1C57E2746855B8B01D38F9CBD79DC87F2AF58135CF485D243D93EBF54C900920, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=62896254F9FECC7DA7B3BA8FDC28BAB4A5C1238D1090C223FD8574F24BA7CA52, cn=AJIT RAMESH JAGTAP
Date: 2026.06.01 12:31:30 +05'30'

**(अजित जगताप)**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. अप्पर मुख्य सचिव, औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई,
२. आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
३. महालेखापाल-महाराष्ट्र (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर,
४. सह सचिव (औषधे), वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई,
५. उप सचिव (अलेप), वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई,
६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
७. निवासी कोषागार अधिकारी, मुंबई,
८. कक्ष अधिकारी/अवर सचिव, वित्त विभाग (विनियम/व्यय-१३), मंत्रालय, मुंबई,
९. निवडनस्ती (औषधे-२).